# L. A. BILL No. LXI OF 2026.

A BILL

FURTHER TO AMEND THE MAHARASHTRA SCHEDULED CASTES, SCHEDULED TRIBES, DE-NOTIFIED TRIBES *(VIMUKTA JATIS)*, NOMADIC TRIBES, OTHER BACKWARD CLASSES AND SPECIAL BACKWARD CATEGORY (REGULATION OF ISSUANCE AND VERIFICATION OF) CASTE CERTIFICATE ACT, 2000.

## सन २०२६ चे विधानसभा विधेयक क्रमांक ६१.

**महाराष्ट्र अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती, विमुक्त जाती, भटक्या जमाती, इतर मागासवर्ग व विशेष मागासप्रवर्ग (जातीचे प्रमाणपत्र देण्याचे व त्याच्या पडताळणीचे विनियमन) अधिनियम, २००० यात आणखी सुधारणा करण्यासाठी विधेयक.**

२००१ चा महा. २३.

**ज्याअर्थी**, यात यापुढे दिलेल्या प्रयोजनांसाठी, महाराष्ट्र अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती, विमुक्त जाती, भटक्या जमाती, इतर मागासवर्ग व विशेष मागासप्रवर्ग ( जातीचे प्रमाणपत्र देण्याचे व त्याच्या पडताळणीचे विनियमन ) अधिनियम, २००० यात आणखी सुधारणा करणे इष्ट आहे; **त्याअर्थी,** भारतीय गणराज्याच्या सत्त्याहत्तराव्या वर्षी, याद्वारे, पुढील अधिनियम करण्यात येत आहे :-

एचबी-९१९–१

संक्षिप्त नाव व प्रारंभ.

**१.** (१) या अधिनियमास, महाराष्ट्र अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती, विमुक्त जाती, भटक्या जमाती, इतर मागासवर्ग व विशेष मागासप्रवर्ग (जातीचे प्रमाणपत्र देण्याचे व त्याच्या पडताळणीचे विनियमन) (सुधारणा) अधिनियम, २०२६, असे म्हणावे.

(२) तो, राज्य शासन, **शासकीय राजपत्रातील** अधिसूचनेद्वारे नियत करील अशा दिनांकास अंमलात येईल.

सन २००१ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २३ याच्या कलम २ ची सुधारणा.

२००१ चा महा. २३.

**२.** महाराष्ट्र अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती, विमुक्त जाती, भटक्या जमाती, इतर मागासवर्ग व विशेष मागासप्रवर्ग (जातीचे प्रमाणपत्र देण्याचे व त्याच्या पडताळणीचे विनियमन) अधिनियम, २००० (यात यापुढे ज्याचा निर्देश, "मुख्य अधिनियम" असा केला आहे) याच्या कलम २ मध्ये, खंड (घ) नंतर, पुढील खंड समाविष्ट करण्यात येतील :-

"(घ-१) "जातीचे बनावट प्रमाणपत्र" याचा अर्थ, सक्षम प्राधिकाऱ्याकडून देण्यात आले असल्याचे भासवणारे, परंतु, वस्तुतः जे उक्त प्राधिकाऱ्याने दिलेले नाही असे जाती प्रमाणपत्र, असा आहे ;

(घ-२) "बनावट वैधता प्रमाणपत्र" याचा अर्थ, पडताळणी समितीकडून देण्यात आले असल्याचे भासवणारे, परंतु, वस्तुतः, जे पडताळणी समितीने दिलेले नाही असे वैधता प्रमाणपत्र, असा आहे ;

(घ-३) "जातीचे खोटे प्रमाणपत्र" याचा अर्थ, खोटी माहिती सादर करून अथवा खोटी कथने किंवा दस्तऐवज दाखल करून अथवा इतर कोणत्याही लबाडीच्या मार्गांनी मिळविलेले जाती प्रमाणपत्र, असा आहे ;

(घ-४) "खोटे वैधता प्रमाणपत्र" याचा अर्थ, खोटी माहिती सादर करून अथवा खोटी कथने किंवा दस्तऐवज दाखल करून अथवा इतर कोणत्याही लबाडीच्या मार्गांनी मिळविलेले वैधता प्रमाणपत्र, असा आहे ;".

सन २००१ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २३ याचे कलम ४क वगळणे.

**३.** मुख्य अधिनियमाचे कलम ४ क वगळण्यात येईल.

सन २००१ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २३ याच्या कलम ५ ची सुधारणा.

**४.** मुख्य अधिनियमाच्या कलम ५ मध्ये, समासटिपेतील, "अपील" या मजकुराऐवजी, "सक्षम प्राधिकाऱ्याच्या आदेशाविरुद्ध अपील" हा मजकूर दाखल करण्यात येईल.

सन २००१ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २३ यामध्ये कलमे ६क व ६ख समाविष्ट करणे.

**५.** मुख्य अधिनियमाच्या कलम ६ नंतर, पुढील कलमे समाविष्ट करण्यात येतील :-

पुनर्विलोकन.

"**६क.** (१) जेव्हा,—

(एक) पडताळणी समितीला, एखाद्या विशिष्ट जातीतील, जमातीतील, वर्गातील किंवा प्रवर्गातील असणाऱ्या कोणत्याही व्यक्तीच्या दाव्याच्या बाबतीत कोणताही प्रतिकूल पुरावा प्राप्त झाला असेल; किंवा

(दोन) कोणत्याही व्यक्तीच्या रक्ताच्या नातेवाईकांनी, लबाडीने किंवा अपवेदन करून किंवा महत्त्वाची तथ्ये लपवून, वैधता प्रमाणपत्र मिळविलेले असेल ; किंवा

(तीन) पडताळणी समिती एखाद्या व्यक्तीला किंवा तिच्या रक्ताच्या नातेवाईकांना वैधता प्रमाणपत्र देतेवेळी, पडताळणी समितीने, महत्त्वाची तथ्ये, सारभूत किंवा महत्वाचा पुरावा यांकडे दुर्लक्ष केले आहे किंवा त्यात अभिलेखावरुन उघड दिसून येणारी चूक आहे अथवा योग्य प्रकारे चौकशी केलेली नाही किंवा त्याची कारणे नोंदविलेली नाहीत अथवा यथोचित विधिप्रक्रियेचे पालन केलेले नाही या निष्कर्षाप्रत आली असेल,

त्या बाबतीत, पडताळणी समिती, कोणत्याही व्यक्तीला किंवा तिच्या रक्ताच्या नातेवाईकांना अथवा अशा व्यक्तीच्या कुटुंबातील सदस्यांना वैधता प्रमाणपत्रे देणाऱ्या तिच्या आदेशांचे, स्वाधिकारे, पुनर्विलोकन करू शकेल :

परंतु, पडताळणी समिती, व्यथित व्यक्तीला, म्हणणे मांडण्याची संधी दिल्याशिवाय, पुनर्विलोकनामध्ये कोणताही आदेश पारित करणार नाही.

(२) पडताळणी समिती, पुनर्विलोकन केल्यानंतर, त्याची कारणे नोंदविल्यानंतर, आदेशाद्वारे, एकतर, वैधता प्रमाणपत्र कायम ठेवील किंवा वैधता प्रमाणपत्र व जाती प्रमाणपत्र रद्द करील व जप्त करील आणि त्याबाबत संबंधित व्यक्तीला व संबंधित नियुक्ती प्राधिकाऱ्याला किंवा शैक्षणिक संस्थेला किंवा इतर कोणत्याही संबंधित प्राधिकरणाला कळवील.

पडताळणी समितीच्या आदेशाविरुद्ध अपील.

**६ ख.** (१) कलम ६, ६क किंवा ७ यांखालील पडताळणी समितीच्या आदेशामुळे व्यथित झालेली कोणतीही व्यक्ती, असा आदेश मिळाल्याच्या दिनांकापासून नव्वद दिवसांच्या आत, **शासकीय राजपत्रातील** अधिसूचनेद्वारे, शासनाने विनिर्दिष्ट केलेल्या अपील प्राधिकरणासमोर, अपील दाखल करू शकेल.

(२) अपील प्राधिकरण, अपील प्राप्त झाल्याच्या दिनांकापासून तीन महिन्यांच्या कालावधीत आणि अपीलकारास म्हणणे मांडण्याची वाजवी संधी दिल्यानंतर, त्यास योग्य वाटेल असा आदेश पारित करील.

(३) या कलमान्वये अपील प्राधिकरणाने पारित केलेला आदेश, अंतिम असेल आणि त्यास, भारताच्या संविधानाच्या अनुच्छेद २२६ अन्वये उच्च न्यायालयाखेरीज, इतर कोणत्याही प्राधिकरणासमोर किंवा न्यायालयामध्ये आव्हान देता येणार नाही.".

सन २००१ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २३ याच्या कलम ७ ची सुधारणा.

**६.** मुख्य अधिनियमाच्या कलम ७ मध्ये,—

(१) पोट-कलम (१) मधील, "प्रमाणपत्र लाबाडीने मिळवले होते" या मजकुराऐवजी, "प्रमाणपत्र खोटे किंवा बनावट आहे" हा मजकूर दाखल करण्यात येईल ;

(२) पोट-कलम (२) वगळण्यात येईल ;

(३) समासटिपेतील, "जातीच्या खोट्या प्रमाणपत्राच्या" या मजकुरानंतर, "जातीच्या बनावट प्रमाणपत्राच्या" हा मजकूर समाविष्ट करण्यात येईल.

सन २००१ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २३ मध्ये कलम ७क समाविष्ट करणे.

**७.** मुख्य अधिनियमाच्या कलम ७ नंतर, पुढील कलम समाविष्ट करण्यात येईल :-

बनावट व खोटे प्रमाणपत्र धारकाविरुद्ध तक्रार.

“**७ क.** (१) जेव्हा पडताळणी समिती, जात प्रमाणपत्र बनावट किंवा खोटे आहे असा आदेश पारित करील तेव्हा, ज्या व्यक्तीने जातीचे बनावट किंवा खोटे प्रमाणपत्र सादर केले आहे, त्या व्यक्तीविरुद्ध सक्षम प्राधिकाऱ्याच्या अधिकारक्षेत्रातील संबंधित पोलीस ठाण्यात प्रथम माहिती अहवाल दाखल करण्याबाबत ती संबंधित सक्षम प्राधिकाऱ्याला निर्देश देईल.

(२) सक्षम प्राधिकारी किंवा या बाबतीत त्याने प्राधिकृत केलेला अधिकारी, जातीचे खोटे प्रमाणपत्र किंवा जातीचे बनावट प्रमाणपत्र धारकाविरुद्ध प्रथम माहिती अहवाल दाखल करील.

(३) पडताळणी समितीचा सदस्य–सचिव किंवा त्याने प्राधिकृत केलेला अधिकारी, बनावट वैधता प्रमाणपत्र किंवा खोटे वैधता प्रमाणपत्र धारकाविरुद्ध प्रथम माहिती अहवाल दाखल करील.”.

सन २००१ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २३ याच्या कलम ९ ची सुधारणा.

**८.** मुख्य अधिनियमाच्या कलम ९ मध्ये, खंड (ङ) नंतर, पुढील खंड जादा दाखल करण्यात येतील :-

“(फ) इतर राज्यातील कोणत्याही कार्यालयाकडील किंवा प्राधिकरणाकडील कोणताही दस्तऐवज शोधून काढण्यास व सादर करण्यास भाग पाडणे ;

(ग) विहित करता येईल अशी इतर कोणतीही बाब.”.

सन २००१ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २३ याच्या कलम १० ची सुधारणा.

**९.** मुख्य अधिनियमाच्या कलम १० मध्ये,-

(१) पोट-कलम (१) मधील, “जातीचे खोटे प्रमाणपत्र” या मजकुराऐवजी, “जातीचे बनावट प्रमाणपत्र किंवा जातीचे खोटे प्रमाणपत्र” हा मजकूर दाखल करण्यात येईल;

(२) पोट-कलम (३) मधील, “खोटे” या मजकुराऐवजी, “बनावट किंवा खोटे” हा मजकूर दाखल करण्यात येईल;

(३) पोट-कलम (४) मध्ये, “जातीचे खोटे प्रमाणपत्र” हा मजकुर ज्या दोन ठिकाणी आला असेल त्या दोन्ही ठिकाणी या मजकुराऐवजी, “जातीचे बनावट प्रमाणपत्र किंवा जातीचे खोटे प्रमाणपत्र” हा मजकूर दाखल करण्यात येईल;

(४) पोट-कलम (४) नंतर, पुढील पोट-कलम जादा दाखल करण्यात येईलः—

“(५) पडताळणी समितीकडून जात प्रमाणपत्र रद्द करण्यात आल्यानंतर व जप्त करण्यात आल्यानंतर, संबंधित नियुक्ती प्राधिकारी, स्थानिक प्राधिकरण, शासन, शैक्षणिक संस्था, सांविधिक मंडळ किंवा अभिकरण,-

(क) जर अपील दाखल केलेले असेल, आणि अपील प्राधिकरणाने ते फेटाळलेले असेल तर, अपील प्राधिकरणाच्या आदेशाच्या दिनांकापासून तीस दिवसांच्या आत;

(ख) जर अपील दाखल केलेले नसेल तर, कलम ६ख च्या पोट-कलम (१) मध्ये विनिर्दिष्ट केलेला अपील कालावधी समाप्त झाल्यापासून तीस दिवसांच्या आत, अशा व्यक्तीला दिलेले लाभ काढून घेण्याची कारवाई करील.”;

(५) समासटिपेतील, “जातीच्या खोट्या प्रमाणपत्राच्या” या मजकुरानंतर, “, जातीच्या बनावट प्रमाणपत्राच्या” हा मजकूर समाविष्ट करण्यात येईल.

सन २००१ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २३ याच्या कलम ११ ची सुधारणा.

**१०.** मुख्य अधिनियमाच्या कलम ११ मध्ये,-

(१) पोट-कलम (१) मधील,-

(एक) खंड (क) नंतर, पुढील खंड समाविष्ट करण्यात येतील :-

“(क-१) खोटी माहिती सादर करून किंवा खोटे विधान करून किंवा खोटे दस्तऐवज दाखल करून किंवा अन्य कोणत्याही प्रकारच्या लबाडीच्या मार्गाने वैधता प्रमाणपत्र मिळवते ; किंवा

(क-२) जातीचे बनावट प्रमाणपत्र किंवा बनावट वैधता प्रमाणपत्र सादर करते; किंवा";

(दोन) खंड (ख) मधील, "जातीचे खोटे प्रमाणपत्र" या मजकुराऐवजी, "जातीचे बनावट प्रमाणपत्र किंवा जातीचे खोटे प्रमाणपत्र" हा मजकूर दाखल करण्यात येईल ;

(तीन) "दोन हजार रुपयांपेक्षा कमी नसेल परंतु वीस हजार रुपयांपर्यंत असू शकेल इतक्या द्रव्यदंडाची किंवा या दोन्ही शिक्षा होतील" या मजकुराऐवजी, "वीस हजार रुपयांपेक्षा कमी नसेल, परंतु पन्नास हजार रुपयांपर्यंत असू शकेल इतक्या द्रव्यदंडाची शिक्षा होईल, अथवा या दोन्ही शिक्षा होतील" हा मजकूर दाखल करण्यात येईल ;

(२) पोट-कलम (२) ऐवजी, पुढील पोट-कलमे दाखल करण्यात येतील :-

"(२) कोणतेही न्यायालय,-

(क) सक्षम प्राधिकाऱ्याने किंवा पडताळणी समितीने अथवा या प्रयोजनासाठी, सक्षम प्राधिकऱ्याने किंवा पडताळणी समितीने यथोचितरीत्या प्राधिकृत केलेल्या अन्य कोणत्याही अधिकाऱ्याने केलेल्या लेखी तक्रारीवरून ; किंवा

(ख) जी तथ्ये मिळून अपराध घडतो त्या तथ्यांच्या पोलीस अहवालावरून,

असेल त्या खेरीज, या कलमान्वये शिक्षापात्र असलेल्या अपराधाची दखल घेणार नाही :

परंतु, असा पोलीस अहवाल, कलम ७क अन्वये ज्या अधिकाऱ्याला प्रथम माहिती अहवाल दाखल करण्यासाठी प्राधिकृत केलेले आहे, त्या अधिकाऱ्याने दाखल केलेल्या प्रथम माहिती अहवालावर आधारित असेल.

(३) जर सक्षम प्राधिकाऱ्याने किंवा पडताळणी समितीने यथोचितरीत्या प्राधिकृत केलेला कोणताही अधिकारी, ज्या व्यक्तीने जातीच्या बनावट प्रमाणपत्राच्या किंवा जातीच्या खोट्या प्रमाणपत्राच्या आधारे लाभ मिळविलेले आहेत त्या व्यक्तीविरुद्ध प्रथम माहिती अहवाल दाखल करण्यात कसूर करील किंवा हेतुपुरस्सर विलंब करील तर, असा अधिकारी, वीस हजार रुपये इतक्या शास्तीस पात्र असेल आणि त्याला लागू असलेल्या सेवा नियमांन्वये शिस्तभंगाच्या कारवाईसाठी देखील पात्र असेल.".

सन २००१ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २३ याच्या कलम १२ ची सुधारणा.

**११.** मुख्य अधिनियमाच्या कलम १२ मध्ये, -

१९७४ चा २. २०२३ चा ४६.

(१) "फौजदारी प्रक्रिया संहिता, १९७३" या मजकुराऐवजी, "भारतीय नागरिक सुरक्षा संहिता, २०२३" हा मजकूर दाखल करण्यात येईल ;

(२) खंड (ख) मधील, "या संहितेच्या कलम २६२ चे पोट-कलम (२) वगळता कलम २६२ ते २६५ (दोन्ही धरून)" या मजकुराऐवजी, "उक्त संहितेची कलमे २८५ (त्याच्या पोट-कलम (२) खेरीज), २८६ ते २८८ (दोन्ही धरून)" हा मजकूर दाखल करण्यात येईल.

सन २००१ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २३ याच्या कलम १३ ची सुधारणा.

**१२.** मुख्य अधिनियमाच्या कलम १३ मध्ये, पोट-कलम (१) मधील, "दोन हजार रुपयांपेक्षा कमी नसेल परंतु वीस हजार रुपयांपर्यंत असू शकेल इतक्या द्रव्यदंडाची किंवा या दोन्ही शिक्षा होतील" या मजकुराऐवजी, "वीस हजार रुपयांपेक्षा कमी नसेल, परंतु पन्नास हजार रुपयांपर्यंत असू शकेल इतक्या द्रव्यदंडाची शिक्षा होईल, अथवा या दोन्ही शिक्षा होतील" हा मजकूर दाखल करण्यात येईल.

सन २००१ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २३ याच्या कलम १६ ची सुधारणा.

**१३.** मुख्य अधिनियमाच्या कलम १६ मधील, "कोणत्याही गोष्टीबद्दल, कोणत्याही व्यक्तीविरुद्ध" या मजकुराऐवजी, "कोणत्याही गोष्टीच्या बाबतीत, सक्षम प्राधिकाऱ्याविरुद्ध अथवा पडताळणी समितीच्या किंवा अपील प्राधिकरणाच्या सदस्याविरुद्ध किंवा कोणत्याही व्यक्तीविरुद्ध" हा मजकूर दाखल करण्यात येईल.

सन २००१ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २३ याच्या कलम १८ ची सुधारणा.

**१४.** मुख्य अधिनियमाच्या कलम १८ मधील, पोट-कलम (१) मध्ये, पुढील परंतुक जादा दाखल करण्यात येईल :-

"परंतु, जर कोणतेही नियम तात्काळ अंमलात आणावेत असे राज्य शासनाचे मत असेल तर, पूर्व प्रसिद्ध न करता, असे नियम करता येतील.".

अडचणी दूर करण्याचा अधिकार.

**१५.** (१) या अधिनियमाद्वारे सुधारणा केल्याप्रमाणे, मुख्य अधिनियमाच्या तरतुदींची अंमलबजावणी करताना कोणतीही अडचण उद्भवल्यास, राज्य शासनास, प्रसंगानुरुप उद्भवेल त्याप्रमाणे, ती अडचण दूर करण्याच्या प्रयोजनांसाठी, त्यास आवश्यक किंवा इष्ट असल्याचे वाटतील असे, या अधिनियमाद्वारे सुधारणा केल्याप्रमाणे, मुख्य अधिनियमाच्या तरतुदींशी विसंगत नसतील असे निदेश, **शासकीय राजपत्रात** प्रसिद्ध केलेल्या आदेशाद्वारे, देता येतील :

परंतु, या अधिनियमाच्या प्रारंभाच्या दिनांकापासून दोन वर्षांचा कालावधी समाप्त झाल्यानंतर, असा कोणताही आदेश काढण्यात येणार नाही.

(२) पोट-कलम (१) अन्वये काढलेला प्रत्येक आदेश, तो काढल्यानंतर, शक्य तितक्या लवकर, राज्य विधानमंडळाच्या प्रत्येक सभागृहासमोर मांडण्यात येईल.

## उद्देश व कारणे यांचे निवेदन

महाराष्ट्र अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती, विमुक्त जाती, भटक्या जमाती, इतर मागासवर्ग व विशेष मागासप्रवर्ग (जातीचे प्रमाणपत्र देण्याचे व त्याच्या पडताळणीचे विनियमन) अधिनियम, २००० (२००१ चा महा. २३) हा, त्यात नमूद केलेल्या राखीव प्रवर्गातील व्यक्तींना जात प्रमाणपत्रे देण्याचे व त्यांची पडताळणी करण्याचे विनियमन करण्याकरिता अधिनियमित केला आहे.

२. राज्य शासनाच्या असे निदर्शनास आले आहे की, जमातींमधील किंवा इतर राखीव प्रवर्गांमधील अर्जदारांच्या दाव्यांच्या विरोधात मोठ्या संख्येतील प्रकरणांमध्ये, प्रतिकूल पुरावे आढळून आलेले आहेत; अर्जदारांनी व त्यांच्या रक्ताच्या नातेवाईकांनी, लबाडीने, अपवेदन करून किंवा महत्त्वाचे दस्तऐवज लपवून, जाती प्रमाणपत्रे व वैधता प्रमाणपत्रे मिळविलेली आहेत आणि म्हणून, अशा खोट्या किंवा बनावट दावेदारांमुळे, राखीव प्रवर्गातील खऱ्या व्यक्ती, आरक्षणाचे लाभ मिळण्यापासून वंचित राहत आहेत.

३. सद्यस्थितीत, उक्त अधिनियमात, पडताळणी समितीच्या आदेशाविरुद्ध अपील करण्याची तरतूद नसल्यामुळे पडताळणी समित्यांच्या आदेशांविरुद्ध उच्च न्यायालयात मोठ्या प्रमाणात रिट याचिका दाखल केल्या जातात.

४. वैधता प्रमाणपत्रे देताना येणाऱ्या अडचणींचे परीक्षण करण्यासाठी आणि शासनाला शिफारशी करण्यासाठी शासनाने, सेवानिवृत्त न्यायमूर्ती, श्री. पी. व्ही. हरदास यांच्या अध्यक्षतेखाली एक समिती घटित केली होती. उक्त समितीने, तिचा अहवाल शासनाला सादर केला आहे, त्याद्वारे, समितीने, उक्त अधिनियमामध्ये व त्याखाली केलेल्या नियमांमध्ये विवक्षित सुधारणा सुचविलेल्या आहेत. शासनाने, उक्त अहवाल विचारात घेतला आहे.

५. वरील वस्तुस्थिती विचारात घेता, राखीव प्रवर्गातील खऱ्या सदस्यांना वैधता प्रमाणपत्र देण्याची आणि खोट्या किंवा बनावट दावेदारांना जात प्रमाणपत्रे व वैधता प्रमाणपत्रे मिळण्यापासून आणि राखीव प्रवर्गासाठी असलेले लाभ मिळण्यापासून प्रतिबंध करण्याची सुनिश्चिती करण्यासाठी, उक्त अधिनियमामध्ये सुयोग्य सुधारणा करणे इष्ट आहे, असे शासनास वाटते.

६. प्रस्तावित सुधारणांची ठळक वैशिष्टे पुढीलप्रमाणे आहेत :-

(क) "जातीचे बनावट प्रमाणपत्र", "बनावट वैधता प्रमाणपत्र", "जातीचे खोटे प्रमाणपत्र" व "खोटे वैधता प्रमाणपत्र" या संज्ञांचा व्याख्यांमध्ये समावेश करणे ;

(ख) पडताळणी समितीने, विवक्षित प्रकरणांमध्ये तिच्या आदेशांचे पुनर्विलोकन करण्याची स्पष्ट तरतूद करणे;

(ग) पडताळणी समितीच्या आदेशांविरुद्धच्या अपीलांची सुनावणी करण्यासाठी अपील प्राधिकरणाची नियुक्ती करण्याची तरतूद करणे;

(घ) उक्त अधिनियमाखालील अपराधांचा प्रथम माहिती अहवाल (FIR) दाखल करण्याची आणि पोलीस अहवालावरून न्यायालयाने अपराधाची दखल घेण्याची तरतूद करणे;

(ङ) अपराधासाठी असलेल्या द्रव्यदंडाच्या रकमेत वाढ करण्याची तरतूद करणे;

(च) सक्षम प्राधिकाऱ्याने किंवा विशेषतः, पडताळणी समितीच्या अथवा अपील प्राधिकरणाच्या सदस्यांनी उक्त अधिनियमानुसार किंवा नियमांनुसार सद्भावनापूर्वक केलेल्या कृत्यांसाठी संरक्षण देण्याची तरतूद करणे.

७. वरील उद्दिष्टे साध्य करणे हा, या विधेयकाचा हेतू आहे.

मुंबई, **डॉ. अशोक वुईके,**

दिनांक ८ जुलै, २०२६. आदिवासी विकास मंत्री.

## वैधानिक अधिकार सोपविण्यासंबंधीचे ज्ञापन

या विधेयकात, वैधानिक अधिकार सोपविण्यासंबंधीचे पुढील प्रस्ताव अंतर्भूत आहेत : -

**खंड १** (२).- या खंडान्वये, हा अधिनियम, ज्या दिनांकास अंमलात येईल तो दिनांक, **शासकीय राजपत्रामध्ये** प्रसिद्ध केलेल्या अधिसूचनेद्वारे नियत करण्याचा अधिकार, राज्य शासनाकडे घेण्यात आला आहे.

**खंड ५.–** मुख्य अधिनियमामध्ये नवीन कलमे ६क व ६ख समाविष्ट करण्याचा हेतू असणाऱ्या या खंडान्वये, प्रस्तावित कलम ६ख च्या पोट-कलम (१) मध्ये, **शासकीय राजपत्रातील** अधिसूचनेद्वारे, अपील प्राधिकरण निर्दिष्ट करण्याचा अधिकार, राज्य शासनाकडे घेण्यात आला आहे.

**खंड १५.–** या खंडान्वये, या अधिनियमाद्वारे सुधारणा केल्याप्रमाणे, मुख्य अधिनियमाच्या तरतुदी अंमलात आणताना, कोणतीही अडचण उद्भवल्यास, ती अडचण दूर करण्यासाठी, या अधिनियमाच्या प्रारंभाच्या दिनांकापासून दोन वर्षांच्या कालावधीत, **शासकीय राजपत्रामध्ये** प्रसिद्ध केलेला आदेश काढण्याचा अधिकार, राज्य शासनाकडे घेण्यात आला आहे.

२. वैधानिक अधिकार सोपविण्यासंबंधीचे वर नमूद केलेले प्रस्ताव, सामान्य स्वरूपाचे आहेत.

(शा.म.मु.) एचबी-९१९–२ (१०४०—०७-२६)

## सन २०२६ चे वि.स.वि. क्र. ६१ महाराष्ट्र अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती, विमुक्त जाती, भटक्या जमाती, इतर मागासवर्ग व विशेष मागासप्रवर्ग (जातीचे प्रमाणपत्र देण्याचे व त्याच्या पडताळणीचे विनियमन (सुधारणा) विधेयक, २०२६.)

## (महाराष्ट्र अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती, विमुक्त जाती, भटक्या जमाती, इतर मागासवर्ग व विशेष मागासप्रवर्ग (जातीचे प्रमाणपत्र देण्याचे व त्याच्या पडताळणीचे विनियमन अधिनियम, २००० यातील उत्तारे)

## (सन २००१ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २३)

**१.** ते **४.** *** *** *** *** ***

२०१८-२०१९ या शैक्षणिक वर्षासाठी विवक्षित व्यावसायिक पाठ्यक्रमांमधील प्रवेशासाठी तात्पुरत्या तरतुदी.

"**४क.** (१) या कलमाच्या तरतुदी, २०१८-२०१९ या शैक्षणिक वर्षासाठी व्यावसायिक पाठ्यक्रमांच्या प्रवेशासंबंधात लागू होतील.

(२) या अधिनियमात काहीही अंतर्भूत असले तरी, जाती प्रमाणपत्र धारण करणाऱ्या व्यक्ती आणि ज्या व्यक्तीने आपल्या किंवा तिच्या वतीने शैक्षणिक संस्थेकडून तिच्या जाती प्रमाणपत्राच्या पडताळणीसाठी व वैधता प्रमाणपत्र देण्यासाठी अर्ज केलेला असेल आणि तो अर्ज पडताळणी समितीसमोर प्रलंबित असेल तर, ती व्यक्ती पुढील शर्तींना अधीन राहून जाती प्रमाणपत्राच्या आधारे प्रवेश प्रक्रियेत सहभागी होण्यासाठी पात्र असेल :-

(एक) ती, वैधता प्रमाणपत्र देण्यासाठी पडताळणी समितीकडे तिने अर्ज केला असल्याचा किंवा तिच्या वतीने पडताळणी समितीकडे अर्ज केला असल्याबाबतचा पुरावा सादर करील.

(दोन) ती, राज्य शासनाशी विचारविनिमय करून, प्रवेश नियामक प्राधिकरणाकडून विनिर्दिष्ट करण्यात येईल अशा दिनांकापूर्वी, तिचे वैधता प्रमाणपत्र प्रवेश प्राधिकरणाकडे सादर करील :

परंतु, खंड (दोन) मध्ये निर्दिष्ट केलेला दिनांक हा, २०१८-२०१९ या शैक्षणिक वर्षासाठी संबंधित व्यावसायिक पाठ्यक्रमाच्या प्रवेशासंबंधात प्रवेश प्रक्रिया समाप्त होण्याच्या दिनाकापूर्वीचा असेल.

(३) तिने पोट-कलम (२) अन्वये प्रवेश नियामक प्राधिकरणाने विनिर्दिष्ट केलेल्या अशा दिनांकापूर्वी वैधता प्रमाणपत्र सादर करण्यात कसूर केली असेल तर, राखीव जागेवर मिळवलेला तात्पुरता प्रवेश, कोणताही असल्यास, तो रद्द झाला असल्याचे मानण्यात येईल.

(४) पोट-कलम (३) मधील कोणत्याही गोष्टीचा, त्या त्यावेळी अंमलात असलेल्या कायद्यानुसार, खुल्या प्रवर्गामधून व्यावसायिक पाठ्यक्रमाच्या प्रवेशासाठी अशी व्यक्ती पात्र आहे असा विचार करण्यास संबंधित प्राधिकरणास प्रतिबंध होत आहे, असा अर्थ लावण्यात येणार नाही.

**स्पष्टीकरण.—** या कलमाच्या प्रयोजनांसाठी, -

(एक) "प्रवेश प्रक्रिया" याचा अर्थ, व्यावसायिक पाठ्यक्रमासाठी प्रवेश प्रक्रिया, असा आहे;

(दोन) "व्यावसायिक पाठ्यक्रम" याचा अर्थ, महाराष्ट्र विनाअनुदानित खाजगी व्यावसायिक शैक्षणिक संस्था (प्रवेश व शुल्क यांचे विनियमन) अधिनियम, २०१५ किंवा त्यावेळी अंमलात असणारा कोणताही इतर कायदा याच्या तरतुदीन्वये व्यावसायिक पाठ्यक्रम म्हणून अधिसूचित केलेला शैक्षणिक अभ्यास पाठ्यक्रम, असा आहे;

(तीन) "प्रवेश नियामक प्राधिकरण" याचा अर्थ, २०१५ चा उक्त अधिनियम याच्या तरतुदीन्वये शासनाने घटित केलेले प्राधिकरण, असा आहे.".

अपील. **५.** (१) कलम ४ च्या पोट-कलम (१) अन्वये सक्षम प्राधिकाऱ्याने दिलेल्या अर्ज फेटाळल्याच्या आदेशाने व्यथित झालेल्या कोणत्याही व्यक्तीस तिला असा आदेश मिळाल्याच्या दिनांकापासून तीस दिवसांच्या आत, शासनाने **राजपत्रातील** अधिसूचनेद्वारे विनिर्दिष्ट केलेल्या अपील प्राधिकाऱ्याकडे अपील करता येईल.

(२) अपील प्राधिकारी, अपिलकारास त्याची बाजू मांडण्याची संधी दिल्यानंतर अपिलकाराच्या दाव्याच्या खरेपणाबद्दल स्वतःची खात्री करून घेतल्यानंतर तीन महिन्यांच्या आत, एकतर सक्षम प्राधिकाऱ्याचा अर्ज फेटाळल्याचा आदेश कायम करू शकेल किंवा तो आदेश रद्द करू शकेल आणि जातीचे प्रमाणपत्र देण्याबाबत सक्षम प्राधिकाऱ्यास निदेश देऊ शकेल.

**६.** *** *** *** *** ***

जातीची खोटी प्रमाणपत्रे जप्त करणे व रद्द करणे. **७.** (१) या अधिनियमाच्या प्रारंभापूर्वी किंवा त्यानंतर, अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती, विमुक्त जाती, भटक्या जमाती, इतर मागासवर्ग किंवा विशेष मागास प्रवर्ग यापैकी कोणत्याही जातीत न मोडणाऱ्या व्यक्तीने, ती स्वतः किंवा तिची मुले अशा जातीतील, जमातीतील किंवा वर्गातील आहेत, असे जातीचे खोटे प्रमाणपत्र मिळविले असेल तर, पडताळणी समिती, स्वाधिकारे, किंवा अन्य मार्गाने अभिलेख मागवील आणि अशा प्रमाणपत्राच्या अचूकतेविषयी चौकशी करील आणि हे प्रमाणपत्र लबाडीने मिळविले होते असे तिला आढळून आल्यास संबंधित व्यक्तीस आपले म्हणणे मांडण्याची संधी दिल्यानंतर विहित केलेली कार्यपद्धती अनुसरून, आदेशाद्वारे प्रमाणपत्र रद्द करील व जप्त करील, आणि जे काही निर्णय असेल त्याबाबत संबंधित व्यक्तीला आणि कोणताही संबंधित प्राधिकारी असल्यास, त्याला त्याबद्दल कळवील.

(२) या अधिनियमान्वये पडताळणी समितीने दिलेला आदेश अंतिम असेल आणि याविरुद्ध भारताच्या संविधानाच्या अनुच्छेद २२६ अन्वये उच्च न्यायालयाव्यतिरिक्त, कोणत्याही प्राधिकरणासमोर किंवा न्यायालयामध्ये आव्हान देता येणार नाही.

**८.** *** *** *** *** ***

सक्षम प्राधिकारी अपील प्राधिकरण व पडताळणी समिती याना दिवाणी न्यायालयाचा अधिकार असणे **९.** या अधिनियमान्वये चौकशी करते वेळी सक्षम प्राधिकाऱ्यास, अपील प्राधिकरणास व पडताळणी समितीस दिवाणी प्रक्रिया सहिता, १९०८ अन्वये दाव्याची न्यायचौकशी करताना दिवाणी न्यायालयाला असलेले सर्व अधिकार आणि विशेषतः पुढील विशिष्ट बाबतीत सर्व अधिकार असतील :-

(अ) कोणत्याही व्यक्तीस समन्स पाठविणे व हजर राहण्यास भाग पाडणे आणि त्याची शपथेवर तपासणी करणे.

(ब) कोणताही दस्तऐवज शोधून काढण्यास व दाखल करण्यास भाग पाडणे ;

(क) शपथपत्रांवर पुरावा स्वीकारणे ;

(ड) कोणत्याही न्यायालयाकडून किंवा कार्यालयाकडून कोणताही सरकारी अभिलेख किंवा त्याची प्रत मागवून घेणे; आणि

(ई) साक्षीदारांची किंवा दस्ताऐवजांची तपासणी करण्यासाठी राजादेश काढणे.

जातीच्या खोट्या प्रमाणपत्राच्या आधारे प्राप्त करण्यात आलेले लाभ काढून घेणे. **१०.** (१) अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती, विमुक्त जाती, भटक्या जमाती, इतर मागासवर्ग किंवा विशेष मागास प्रवर्ग यांपैकी कोणत्याही वर्गात मोडत नसलेल्या ज्या कोणत्याही व्यक्तीने जातीचे खोटे प्रमाणपत्र सादर करून कोणत्याही शैक्षणिक सस्थेत, अशा जाती, जमाती किंवा वर्ग यांच्यासाठी राखीव असलेल्या जागेवर प्रवेश मिळविला असेल किंवा शासनामध्ये, स्थानिक प्राधिकरणामध्ये किंवा शासनाच्या मालकीच्या किंवा शासनाच्या नियंत्रणाखाली असलेल्या इतर कोणत्याही कंपनीत किंवा महामंडळात किंवा कोणत्याही शासकीय अनुदानप्राप्त संस्थेत किंवा सहकारी संस्थेत, अशा जाती, जमाती किंवा वर्ग यांच्यासाठी राखीव असलेल्या पदावर नियुक्ती मिळविली असेल तर पडताळणी समितीकडून जातीचे प्रमाणपत्र रद्द

करण्यात आल्यानंतर ती व्यक्ती संबंधित शैक्षणिक संस्थेमधून काढून टाकली जाण्यास किंवा यथास्थिति, उक्त सेवेतून तात्काळ सेवामुक्त केली जाण्यास पात्र ठरेल आणि उपरोक्तानुसार अशा प्रवेशाच्या किंवा नियुक्तीच्या अनुरोधाने अशा व्यक्तीने घेतलेले किंवा प्राप्त केलेले इतर कोणतेही लाभ तात्काळ काढून घेण्यात येतील.

(२) *** *** *** *** ***

(३) त्या त्या वेळी अंमलात असलेल्या कोणत्याही अधिनियमात काहीही अतर्भूत असले तरी जे नंतर खोटे असल्याचे सिद्ध झाले असेल अशा, जातीच्या प्रमाणपत्राच्या आधारे, कोणत्याही शैक्षणिक संस्थेमध्ये प्रवेश मिळवून प्राप्त केलेली कोणतीही पदवी, पदविका किंवा इतर कोणतीही शैक्षणिक अर्हता, पडताळणी समितीने असे जातीचे प्रमाणपत्र रद्द केल्यानंतर रद्द होईल.

(४) त्या त्या वेळी अंमलात असलेल्या कोणत्याही कायद्यात काहीही अंतर्भूत असले तरी कोणत्याही व्यक्तीने अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती, विमुक्त जाती, भटक्या जमाती, इतर मागास वर्ग किंवा विशेष मागास प्रवर्ग यांच्यासाठी राखीव असलेल्या जागेवर अशा जातीत, जमातीत किंवा वर्गात मोडत असल्याचे जातीचे खोटे प्रमाणपत्र सादर करून स्थानिक प्राधिकरणाची, सहकारी संस्थेची किंवा कोणत्याही सांविधिक मंडळाची निवडणूक लढविली असेल तर, पडताळणी समितीने असे जातीचे खोटे प्रमाणपत्र रद्द केल्यानंतर ती कोणत्याही सांविधित मंडळाचा सदस्य होण्यास अनर्ह ठरेल आणि अशा व्यक्तीने प्राप्त कलेले काणतेही लाभ जमीन महसुलाच्या थकबाकीप्रमाणे वसूल करण्यात येतील, आणि अशा व्यक्तीची निवडणूक ही भूतलक्षी प्रभावाने समाप्त झाली असल्याचे मानण्यात येईल.

**११.** (१) जी कोणतीही व्यक्ती,- अपराध व शास्ती.

(क) *** *** *** *** ***

(ख) ती, कोणत्याही अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती, विमुक्त जाती, भटक्या जमाती इतर मागास वर्ग किंवा विशेष मागास प्रवर्ग यांमधील व्यक्ती नसताना जातीचे खोटे प्रमाणपत्र सादर करून शासनामध्ये, स्थानिक प्राधिकरणामध्ये किंवा शासनाच्या मालकीच्या किंवा त्याच्या नियंत्रणाखालील इतर कोणत्याही कंपनीमध्ये किंवा महामंडळामध्ये किंवा कोणत्याही शासकीय अनुदानप्राप्त संस्थेमध्ये अशा जाती, जमाती किंवा वर्ग किंवा यांच्याकरिताच केवळ राखून ठेवण्यात आलेले कोणतेही लाभ किंवा नियुक्त्या मिळविते किंवा कोणत्याही शैक्षणिक संस्थेमध्ये अशा जाती, जमाती, किंवा वर्ग यांच्याकरिताच केवळ राखून ठेवण्यात आलेल्या जागेवर प्रवेश मिळविते किंवा कोणत्याही स्थानिक प्राधिकरणाच्या किंवा सहकारी संस्थेच्या, अशा जाती, जमाती किंवा वर्ग यांच्याकरिता राखून ठेवण्यात आलेल्या कोणत्याही निर्वाचन पदावर निवडून येईल.

अशा व्यक्तीस, अपराधसिद्धीनंतर, सहा महिन्यांपेक्षा कमी नसेल परंतु दोन वर्षांपर्यंत असू शकेल इतक्या सश्रम कारावासाची किंवा दोन हजार रुपयांपेक्षा कमी नसेल परंतु विस हजार रुपयांपर्यंत असू शकेल इतक्या द्रव्यदंडाची किंवा या दोन्ही शिक्षा होतील.

(२) कोणतेही न्यायालय पडताळणी समितीने किंवा या प्रयोजनार्थ पडताळणी समितीने यथोचित रीत्या प्राधिकृत केलेल्या इतर कोणत्याही अधिकाऱ्याने केलेल्या, लेखी तक्रारीशिवाय, या कलमाखालील शिक्षापात्र अपराधाची दखल घेणार नाही.

**१२.** फौजदारी प्रक्रिया संहिता, १९७३ मध्ये काहीही अंतर्भूत असले तरी,- या अधिनियमाखालील अपराध दखलपात्र व बेजमानती असणे.

(क) *** *** *** *** ***

(ख) या अधिनियमाखालील प्रत्येक शिक्षापात्र अपराधाची संक्षिप्त रीतीने प्रथम श्रेणी दंडाधिकाऱ्याकडून न्यायचौकशी करण्यात येईल आणि या संहितेच्या कलम २६२ चे पोट-कलम (२) वगळता कलम २६२ ते २६५ (दोन्ही धरून) च्या तरतुदी शक्य असेल तितपत, अशा न्यायचौकशीला लागू होतील.

जातीचे खोटे प्रमाणपत्र देणाऱ्यास शास्ती.

**१३.** (१) या अधिनियमान्वये, सक्षम प्राधिकाऱ्याची कामे पार पाडणारी जी कोणतीही व्यक्ती किंवा प्राधिकारी, हेतुपुरस्सर जातीचे खोटे प्रमाणपत्र देईल त्या व्यक्तीस अपराधसिद्धीनंतर सहा महिन्यांपेक्षा कमी नसेल परंतु दोन वर्षांपर्यंत असू शकेल इतक्या सश्रम कारावासाची किंवा दोन हजार रुपयांपेक्षा कमी नसेल परंतु वीस हजार रुपयांपर्यंत असू शकेल इतक्या द्रव्यदंडाची किंवा या दोन्ही शिक्षा होतील.

(२) *** *** *** *** ***

**१४.** व **१५.** *** *** *** *** ***

सद्‌भावनापूर्वक केलेल्या कृतींना संरक्षण.

**१६.** हा अधिनियम किंवा त्याखाली करण्यात आलेले नियम यांनुसार, सद्‌भावनेने करण्यात आलेल्या किंवा करण्याचे अभिप्रेत असलेल्या कोणत्याही गोष्टीबद्दल, कोणत्याही व्यक्तीविरुद्ध कोणताही दावा, खटला किंवा अन्य कायदेशीर कार्यवाही करता येणार नाही.

**१७.** *** *** *** *** ***

नियम तयार करण्याचा अधिकार.

**१८.** (१) या अधिनियमाच्या सर्व किंवा काही तरतुदी पार पाडण्याकरिता राज्य शासनास, राजपत्रातील अधिसूचनेद्वारे, आणि पूर्वप्रसिद्धीच्या शर्तींच्या अधीन राहून, नियम करता येतील.

(२) *** *** *** *** ***

**१९.** *** *** *** *** ***

**महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय.**

**[ सन २०२६ चे विधानसभा विधेयक क्रमांक ६१. ]**

**[ महाराष्ट्र अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती, विमुक्त जाती, भटक्या जमाती, इतर मागासवर्ग व विशेष मागासप्रवर्ग (जातीचे प्रमाणपत्र देण्याचे व त्याच्या पडताळणीचे विनियमन) अधिनियम, २००० यात आणखी सुधारणा करण्यासाठी विधेयक.]**

**[ डॉ. अशोक वुईके,**
आदिवासी विकास मंत्री.**]**

**जितेंद्र भोळे,**
सचिव (१),
महाराष्ट्र विधानसभा.

शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, मुंबई.